निलंबनाचा आढावा - महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरणाने दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने निलंबन आढावा समितीस द्यावयाच्या सूचना

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक: निप्रआ १२१८/प्र.क्र.७/११अ**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक: २८ मार्च, २०१८

वाचा:- १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, कमांक: निप्रआ-११११/प्र.क्र.८६/११अ, दिनांक १४/१०/२०११
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, कमांक: अभियो १३१४/प्र.क्र.८६/११अ, दिनांक ३१/०१/२०१५

**परिपत्रक:-**

वरील १) व २) येथील आदेशान्वये शासकीय कर्मचाऱ्यांच्या निलंबनाचा आढावा घेण्यासंबंधीच्या सविस्तर सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरण मुंबई. यांनी श्री. रविद्र भारती, विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर (मूळ अर्ज क्र. १०२३/२०१७) या प्रकरणामध्ये पुढीलप्रमाणे आदेश पारित केले आहेत.

१) It is a matter of genuine application that while deciding to continue or to revoke the suspension, the record relating to criminal case is really not studied and the decision to continue the suspension is taken subjectively than objectively.

२) It is, therefore, considered necessary that this fact needs to be brought to the notice of the Chief Secretary for issue of directions to the Committee Members that whenever review of suspension is to be done in the background of criminal case, the documents such as stage of investigation, Case Diary, statement of witnesses and other evidence gathered by the Police be attended to and whenever it be a case other than suspension on account of a criminal case, all relevant papers must be examined and objective satisfaction must be recorded.

३) The Committee Members and the officer functioning as Secretary of the Committee should be cautioned that if such matters of deficient consideration comes before this Tribunal apart from personal liability towards costs of cases, serious view as regards failure to perform duty by the officers concerned could be taken by this Tribunal, apart from any liability towards disciplinary action.

४) Therefore, Chief Secretary is directed to issue proper order and necessary guidelines within two months from the date of receipt of this order.

२. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरणाने दिलेले आदेश विचारात घेता असे नमूद करण्यात येते की, ज्यावेळी फौजदारी प्रकरणाच्या अनुषंगाने शासकीय कर्मचाऱ्याच्या निलंबनाचा आढावा घेण्यात येतो त्यावेळी प्रकरणाशी संबंधीत सर्व कागदपत्रे (पोलीस तपासाशी संबंधीत सद्यस्थिती, केस डायरी, साक्षीदारांचे जबाब आणि पोलीसांनी गोळा केलेले अन्य पुरावे) तपासून घ्यावीत व त्याबाबतची वस्तुस्थिती निलंबन आढावा समितीने सर्वंकषपणे विचारात घ्यावी, तद्नंतरच निलंबन समाप्त करावे की पुढे चालू ठेवावे याबाबत जाणीवपूर्वक निर्णय घेऊन समितीने सुयोग्य कारणमिमांसेसह शिफारस करावी.

३. मंत्रालयातील सर्व विभांगानी वरील बाब त्यांच्या आधिपत्याखालील सर्व विभागप्रमुख/कार्यालयप्रमुख यांच्या निदर्शनास आणून द्यावी.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१८०३२८१८३०५९५१०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Bhatu Sambhu Wankhede

Digitally signed by Bhatu Sambhu Wankhede
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=493af62b137d3b8ad2fb93133b4b083c9cafb89b6793bfa8d7eb b7ba735e6d9d, serialNumber=454f1eaad82ae32f06775522a32735d46dc9a815a777254 a802deaa980512d11, cn=Bhatu Sambhu Wankhede
Date: 2018.03.28 19:09:38 +05'30'

(भ.सं. वानखेडे)
उप सचिव, महाराष्ट शासन

**प्रत:**

१. मा. राज्यपालांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव,
३. मा. मुख्य सचिव,
४. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव मंत्रालयीन विभाग
५. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरण मुंबई.
६. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
७. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
८. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
९. सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
१०.सर्व विभागीय आयुक्त,
११.सर्व जिल्हाधिकारी
१२.सामान्य प्रशासनातील सर्व कार्यासने.
१३.निवडनस्ती